# इतिहास–राज्यशास्त्र

## उत्तरे : सराव कृतिपत्रिका 3 री

**प्र. 1. (अ)**

(1) दूरदर्शन हे दृक्-श्राव्य माध्यम आहे.

(2) परंपरेनुसार कीर्तनपरंपरेचे आद्य प्रवर्तक नारदमुनी होत, असे मानले जाते.

(3) थॉमस कुकने पर्यटन तिकिटे विकण्याचा एजन्सी व्यवसाय सुरू केला.

**प्र. 1. (ब) चुकीच्या जोड्या :**

(1) रम्मन – पश्चिम बंगालमधील नृत्य

(2) त्रैमासिक – दर दोन महिन्याला प्रकाशित होणारे

(3) हॉकीचे जादूगार – मिल्खा सिंग.

**प्र. 2. (अ)**

**(1)**


| इतिहासकार | ग्रंथाचे नाव |
|---|---|
| जेम्स मिल | द हिस्टरी ऑफ ब्रिटिश इंडिया |
| जेम्स ग्रँट डफ | ए हिस्टरी ऑफ द मराठाज् |
| माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन | द हिस्टरी ऑफ इंडिया |
| श्री. अ. डांगे | प्रिमिटिव्ह कम्युनिझम टु स्लेव्हरी |
| डॉ. बाबासाहेब आंबेडकर | हू वेअर द शूद्राज |

**(2)**

**जागतिक अमूर्त वारसा यादीतील भारतातील समाविष्ट परंपरा**

- झारखंड व ओडिशा → छाऊ नृत्य
- केरळ → मुडियेट्टू विधिनाट्य व नृत्यनाट्य
- मणिपूर → संकीर्तन परंपरा
- पंजाब → ठठेरा जमातीची तांब्याची व पितळेची भांडी बनवण्याची कलापरंपरा

(3)




(**टीप :** *प्रत्येकी किमान एक नाव लिहिणे अपेक्षित आहे.*)

**प्र. 2. (ब)**

**(1) ॲनल्स प्रणाली :**

(१) राजकीय अभ्यासाबरोबरच स्थानिक लोक, तत्कालीन हवामान, व्यापार, शेती, तंत्रज्ञान, दळणवळण व संपर्काची साधने, सामाजिक विभागणी आणि समूहाची मानसिकता यांचाही अभ्यास करणे महत्त्वाचे मानले जाऊ लागले. या विचारप्रणालीलाच 'ॲनल्स प्रणाली' असे म्हणतात.

(२) फ्रेंच इतिहासकारांनी विसाव्या शतकात ही प्रणाली विकसित केली. ॲनल्स प्रणालीमुळे इतिहासलेखनास एक निराळीच दिशा प्राप्त झाली.

**(2) अभिलेखागार :**

(१) ऐतिहासिक दस्तऐवज ज्या ठिकाणी जतन करून ठेवलेले असतात, त्या ठिकाणास 'अभिलेखागार' असे म्हणतात.

(२) अभिलेखागारांमध्ये महत्त्वाची जुनी कागदपत्रे, दप्तरे, जुने चित्रपट, जागतिक करारांचे ऐवज इत्यादी बाबी जतन करून ठेवल्या जातात.

(३) अभिलेखागारांमुळे मूळ कागदपत्रांचे संदर्भ मिळतात. तत्कालीन ऐतिहासिक घटनांचा अभ्यास करता येतो.

(४) भारताचे दिल्ली येथील राष्ट्रीय अभिलेखागार हे आशिया खंडातील सर्वांत मोठे अभिलेखागार आहे. भारतातील प्रत्येक राज्याचे स्वतःचे स्वतंत्र अभिलेखागारही आहे.

**(3) सरस्वती महाल ग्रंथालय :**

(१) सोळाव्या-सतराव्या शतकातील नायक राजांच्या काळात तमिळनाडूमधील तंजावर येथे 'सरस्वती महाल ग्रंथालय' बांधले गेले.

(२) व्यंकोजीराजे भोसले यांनी १६७५ साली तंजावर जिंकल्यानंतर त्यांनी व त्यांच्या वंशजांनी हे ग्रंथालय अधिक समृद्ध केले.

(३) या ग्रंथालयात सुमारे ४९००० ग्रंथ आहेत. हे प्राचीन ग्रंथ हा इतिहासाचा फार मोठा ठेवा आहे. तत्कालीन महत्त्वाची कागदपत्रे, मोडी लिपीतील ग्रंथ, दस्तऐवज या ग्रंथालयात संग्रहित केलेले आहेत. प्राचीन इतिहासाची ती महत्त्वाची साधने आहेत.

(४) हे ग्रंथालय समृद्ध करण्यात सरफोजीराजे भोसले यांचे मोठे योगदान असल्याने १९१८ मध्ये या ग्रंथालयाला त्यांचे नाव देण्यात आले.

**प्र. 3.**

**(1)** (१) इंग्रजी शिक्षणाने भारतीयांत निर्माण झालेल्या आत्मजाणिवेने राष्ट्रवादी इतिहासलेखनास प्रवृत्त केले.

(२) ब्रिटिश अधिकाऱ्यांनी लिहिलेल्या भारताच्या पूर्वग्रहदूषित इतिहासाला भारताच्या विविध प्रांतांतील इतिहासलेखकांनी विरोध केला.

(३) दक्षिण भारताच्या प्रादेशिक वैशिष्ट्यांकडे आणि इतिहासाकडे इतिहासकारांचे लक्ष वेधले गेले.

(४) राष्ट्रवादी इतिहासलेखनाचा प्रभाव होताच. त्यातूनच प्रादेशिक इतिहासलेखनाला चालना मिळाली.

**(2)** (१) कलावस्तूंच्या खरेदी-विक्रीचे एक स्वतंत्र क्षेत्र असते.

(२) या कलावस्तू नकली आहेत की खऱ्या आहेत, त्यांतील धातू, लाकडाचा प्रकार, त्यांचा दर्जा योग्य आहे का हे त्यातील जाणकारच सांगू शकतो.

(३) कलावस्तूतील कलेचा दर्जा कसा आहे, हे कलाकारच ओळखू शकतात.

(४) एकूण, कलावस्तूंचे मूल्य ठरवताना वरील सर्व गोष्टींची पारख होणे आवश्यक असते; त्यासाठी कलेच्या इतिहासाचा सखोल अभ्यास असणाऱ्या तज्ज्ञांची आवश्यकता असते.

**(3)** (१) बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी मुंबईत 'दर्पण' हे वृत्तपत्र सुरू केले.

(२) मराठी भाषेतून सुरू झालेले हे पहिले वृत्तपत्र होते.

(३) या वृत्तपत्राचे संपादक या नात्याने बाळशास्त्री जांभेकर हे आद्यसंपादक होत.

(४) जांभेकरांनी 'दर्पण' हे वृत्तपत्र सुरू करून मराठी वृत्तपत्रसृष्टीचा पाया घातला.

म्हणून दर्पणचा पहिला अंक प्रसिद्ध झालेला '६ जानेवारी' हा दिवस महाराष्ट्रात 'पत्रकार दिन' म्हणून साजरा केला जातो.

**(4)** (१) भारतात पाश्चात्त्यांच्या वैद्यकीय सुविधांपेक्षा दर्जेदार व स्वस्त वैद्यकीय सुविधा मिळतात.

(२) नवीन तंत्रज्ञान व तज्ज्ञ सर्जन भारतात उपलब्ध आहेत. त्यामुळे रोगमुक्त होण्याची खात्री परकीयांना वाटते.

(३) भारतात सूर्यप्रकाश मुबलक असल्याने त्याचा लाभ घेण्यासाठी परदेशी लोक येथे येतात.

(४) योगशिक्षण आणि आयुर्वेदिक उपचार ही तर भारताने जगाला दिलेली देणगीच आहे. असे विविध वैद्यकीय उपचार घेण्यासाठी परदेशी लोकांचे भारतात येण्याचे प्रमाण वाढलेले दिसते.

**प्र. 4.**

**(1)** प्राचीन ऑलिम्पिक खेळाची स्पर्धा ऑलिम्पिया या ग्रीसमधील शहरात घेतली जात असे.

**(2)** खेळ आणि ग्रीक लोक यांचे नाते प्राचीन काळापासूनचे आहे.

**(3)** (१) ऑलिम्पिक ही आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्पर्धा दर चार वर्षांनी होते. ग्रीस देशाने जगाला ऑलिम्पिक स्पर्धेची देणगी दिली.

(२) प्राचीन ग्रीस नगरराज्यांमध्ये ऑलिम्पिया या नगरराज्यात दर चार वर्षांनी विविध खेळांच्या स्पर्धा होत असत.

(३) धावणे, थाळीफेक, रथ व घोड्यांच्या शर्यती, कुस्ती, मुष्टियुद्ध हे खेळ ग्रीकांनी सुरू केले आणि खेळांना नियमित व सुसंघटित स्वरूप दिले.

(४) एकमेकांत अडकवलेली पाच वर्तुळे, हे ऑलिम्पिक स्पर्धेचे बोधचिन्ह असून ते पाच खंडांचे प्रतिनिधित्व करते. मैत्री, सद्भाव, ईर्षा, शांतता व संघभावना यांचे ते प्रतीक मानले जाते.

**प्र. 5.**

**(1)** आधुनिक इतिहासलेखन पद्धतीची चार वैशिष्ट्ये –

(१) या शास्त्रशुद्ध पद्धतीची सुरुवात योग्य प्रश्नांची मांडणी करण्यापासून होते.

(२) हे प्रश्न मानवकेंद्रित असून भूतकालीन मानवी समाजघटकांनी विशिष्ट कालावधीत केलेल्या कृतींसंबंधी असतात. त्या कृतींचा संबंध दैवी घटनांशी वा कथा-कहाण्यांशी जोडलेला नसतो.

(३) या प्रश्नांच्या उत्तरांना इतिहासातील विश्वासार्ह पुराव्यांचा आधार असल्याने त्यांची मांडणी तर्कसंगत असते.

(४) मानवाने केलेल्या भूतकालीन कृतींच्या आधारे मानवजातीच्या वाटचालीचा वेध इतिहासात घेतला जातो.

**(2)** मध्ययुगीन भारतात मुस्लीम सत्तांच्या काळात विकसित झालेल्या या मुस्लीम स्थापत्यशैलीची वैशिष्ट्ये व उदाहरणे पुढीलप्रमाणे –

(१) पर्शियन, मध्य आशियाई, अरबी आणि इस्लामपूर्व भारतीय स्थापत्य अशा अनेक स्थापत्यशैलींतून विकसित झालेल्या स्थापत्यशैलीस 'मुस्लीम स्थापत्यशैली' असे म्हणतात.

(२) या स्थापत्यशैलीत बांधलेला कुतुबमिनार जगातील सर्वाधिक उंच (२४० फूट) आहे.

(३) मुघल सम्राट शाहजहानने बांधलेला ताजमहाल ही वास्तू जगातील आठवे आश्चर्य मानले जाते.

(४) इसवी सनाच्या सतराव्या शतकात बांधलेला विजापूरचा गोलघुमट ही वास्तू प्रतिध्वनीसाठी प्रसिद्ध आहे.

(५) फतेहपूर येथे सम्राट अकबराने बांधलेला राजवाडा आणि बुलंद दरवाजा त्याच्या उंचीसाठी आणि भव्यतेसाठी प्रसिद्ध आहे.

(६) दिल्ली आणि आग्रा येथे मुघल सम्राटांनी बांधलेले लाल किल्ले विस्तीर्ण आणि देखणे आहेत.

वरील सर्व वास्तू मुस्लीम स्थापत्यशैलीचे उत्तम नमुने आहेत.

**(3)** (१) भारतात चलच्चित्रपटाचा प्रारंभ महादेव गोपाळ पटवर्धन कुटुंबीयांनी १८८५ मध्ये केला.

(२) १८९९ मध्ये हरिश्चंद्र सखाराम भाटवडेकर उर्फ सावेदादा यांनी भारतातील पहिला लघुपट तयार करून तो मुंबईत आझाद मैदानावर दाखवला.

(३) दादासाहेब तोरणे, करंदीकर, पाटणकर व दिवेकर यांनी परदेशी तंत्रज्ञांची मदत घेऊन 'पुंडलिक' हा कथापट १९१२ मध्ये मुंबईत दाखवला.

(४) दादासाहेब फाळके यांनी १९१३ मध्ये संपूर्ण भारतीय तंत्रज्ञान वापरून स्वतः दिग्दर्शित केलेला 'राजा हरिश्चंद्र' हा पहिला भारतीय चित्रपट मुंबई येथे प्रदर्शित केला.

अशा रितीने भारतात पहिला पूर्ण लांबीचा चित्रपट तयार करून प्रदर्शित करण्याचा मान महाराष्ट्राकडे जातो; म्हणून 'भारतीय चित्रपटसृष्टीची जननी' अशी महाराष्ट्राची ख्याती आहे.

**(4)** ग्रंथालय म्हणजे केवळ ग्रंथांचा संग्रह करणे नव्हे. संग्रह केलेल्या ग्रंथांचे व्यवस्थापन होणे महत्त्वाचे असते.

(१) ग्रंथांच्या पद्धतशीर आयोजनामुळे वाचकांना हवी ती पुस्तके लगेच मिळू शकतात.

(२) कोणते पुस्तक नेमके कोठे ठेवले आहे, ते त्वरित सांगता येऊ शकते. त्यामुळे पुस्तकांचा शोध घेण्यात ग्रंथालय व्यवस्थापनाचा आणि वाचकांचा दोन्हींचाही वेळ वाया जात नाही.

(३) उत्तम व्यवस्थापनामुळे ग्रंथांचे जतन व संवर्धनही चांगल्या प्रकारे होते. पुस्तकांचा विध्वंस होत नाही.

(४) व्यवस्थापन जाणकार असेल; तर ग्रंथालयात उत्तम दर्जाच्या ग्रंथांचे संकलन केले जाते. त्यामुळे चोखंदळ वाचकांना उत्तम दर्जाची पुस्तके मिळू शकतात.

(५) एकाच प्रकारच्या विषयाच्या पुस्तकांचा संग्रह न होता विविध प्रकारच्या पुस्तकांना ग्रंथालयात स्थान मिळते. उत्तम व्यवस्थापनामुळे ग्रंथांची सूची, संगणकीय प्रणाली, अन्य आधुनिक सोयी वाचकांना उपलब्ध होऊ शकतात.

(६) कल्पक व्यवस्थापक ग्रंथालयाचा वाचकवर्ग वाढवण्यासाठी ग्रंथांचे प्रदर्शन भरवणे, जाहिरात करणे अशा विविध मार्गांचा अवलंब करून ग्रंथालयाचा विस्तार करतात. यासाठी ग्रंथालय व्यवस्थापन उत्तम असणे महत्त्वाचे असते.

**प्र. 6.**

(1) भारतात २६ जानेवारी १९५० पासून संविधानानुसार राज्यकारभार करण्यास सुरुवात झाली.

(2) पाण्याचे नोबेल समजले जाणारे 'स्टॉकहोम वॉटर प्राइझ' भारताच्या डॉ. राजेंद्र सिंह यांना मिळाले आहे.

**प्र. 7.**

**(1)** हे विधान बरोबर आहे; कारण –

(१) भारतीय संविधानाने स्वातंत्र्यपूर्वकाळातील मतदानाच्या अधिकारासाठी आवश्यक असणारी सर्व बंधने रद्द केल्यामुळे मतदारांची संख्या वाढली आहे.

(२) संविधानाने स्वीकारलेल्या प्रौढ मताधिकाराच्या तरतुदीमुळे सर्व प्रौढ स्त्री-पुरुषांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला आहे.

(३) सुरुवातीस मताधिकारासाठी असणारी २१ वर्षांची अट नंतर १८ वर्षे पूर्ण इथपर्यंत करण्यात आल्यामुळे मताधिकार अधिक व्यापक झाला. मतदारांची एवढी संख्या जगातील कोणत्याच लोकशाही देशात नाही; म्हणून भारतीय लोकशाही ही जगातील सर्वांत मोठी लोकशाही मानली जाते.

**(2)** हे विधान चूक आहे; कारण –

(१) निवडणुकीचे संपूर्ण संचालन करण्याची जबाबदारी निवडणूक आयोगाची असते.

(२) राज्यसरकारवर ही जबाबदारी दिली जाऊ शकत नाही.

(३) म्हणूनच संविधानाने ही जबाबदारी पार पाडण्यासाठी स्वतंत्र निवडणूक आयोगाची स्थापना केलेली आहे; त्यामुळे एखाद्या घटकराज्यात केव्हा व किती टप्प्यांत निवडणुका घ्यायच्या, हे निवडणूक आयोग ठरवते.

**(3)** हे विधान बरोबर आहे; कारण –

(१) चळवळ हे लोकांचे विशिष्ट प्रश्नाभोवती निर्माण झालेले संघटन असते.

(२) लोकांच्या प्रश्नांशी निगडित असणाऱ्या चळवळीसच लोक पाठिंबा देतात.

(३) लोकांच्या हिताच्या समस्या निवडून निश्चित कार्यक्रम ठरवून त्याआधारे जनसंघटन करण्याची गरज असते. यासाठी कोणतीही चळवळ उभी करण्यासाठी लोकांचा सक्रिय पाठिंबा आवश्यक असतो.

**प्र. 8. (अ)**

**(1) प्रादेशिकता :**

(१) भारतात विविध भाषा बोलणारे, विविध परंपरा आणि संस्कृती असणारे लोक राहतात.

(२) भौगोलिक विविधतेबरोबरच साहित्य, शिक्षण, इतिहास, चळवळी यांबाबतीतही भारतात विविधता आढळते.

(३) प्रत्येकालाच आपली भाषा, परंपरा, संस्कृती यांच्याविषयी आत्मीयता वाटते. या आत्मीयतेतूनच वरील सर्वांबाबत अस्मिता निर्माण होते.

(४) आपल्या भाषेच्या, प्रदेशाच्या विकासाला लोक प्राधान्य देऊ लागतात. यालाच 'प्रादेशिकता' असे म्हणतात.

**(2) डावे उग्रवादी :**

(१) भूमिहीन शेतकरी, आदिवासी यांच्यावर जमीनदारांकडून होणारा अन्याय दूर करून त्यांच्याकडील जमिनी बळकावण्यासाठी पश्चिम बंगाल या राज्यात नक्षलवादी चळवळ सुरू झाली.

(२) या चळवळीवर मार्क्सवादाचा प्रभाव असल्याने त्यांना 'डाव्या विचारसरणीचे' म्हणून संबोधले जाते.

(३) सुरुवातीच्या उद्दिष्टांपासून भरकटत जाऊन ही चळवळ आता उग्रवादी बनली आहे.

(४) शेतकरी-आदिवासी यांना न्याय देण्याऐवजी ही चळवळ सरकारला हिंसक पद्धतीने विरोध करीत आहे. राजकीय नेते, पोलीस, लष्कर यांच्यावर सशस्त्र हल्ले केले जात आहेत.

**प्र. 8. (ब)**

**(1)**

**निवडणूक प्रक्रियेतील राजकीय पक्ष व त्यांचे उमेदवार यांची भूमिका**

- उमेदवार निश्चित करून त्यांना पक्षाचे तिकीट देणे.
- उमेदवारी अर्ज निवडणूक आयोगाला मुदतीत सादर करणे.
- निवडणुकीचा प्रचार करणे.
- निवडणूक खर्चाचा हिशेब आयोगाला सादर करणे.
- निवडणूक आचारसंहितेचे पालन करणे.

**(2)**

| इ. स. १८८५ | इ. स. १९६४ | इ. स. १९८० | इ. स. १९८४ | इ. स. २०१२ | इ. स. २०१३ |
|---|---|---|---|---|---|
| भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) | भारतीय जनता पक्ष | बहुजन समाज पक्ष | आम आदमी पार्टी | नॅशनल पिपल्स पार्टी |

**प्र. 9.**

**(1)** न्यायालयांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयांमुळे महिलांच्या सन्मानाची आणि प्रतिष्ठेची जपणूक होण्यास मदत झाली.

(१) घटस्फोटित महिलांना पोटगी देण्याचे पुरुषांवरील बंधन तसेच समान कामासाठी स्त्रियांना पुरुषांएवढेच वेतन, या कायद्यांवर न्यायालयाने शिक्कामोर्तब केले आहे.

(२) वडिलांच्या संपत्तीत विवाहित मुलींचाही समान वाटा असेल, या न्यायालयाच्या निर्णयामुळे स्त्रियांना आर्थिक सुरक्षितता मिळाली.

(३) प्रार्थनास्थळी सर्व स्त्रियांना मुक्त स्वातंत्र्य असेल, या न्यायालयाच्या निर्णयामुळे सर्व धर्मांतील स्त्रियांना प्रतिष्ठा मिळाली.

(४) खाप पंचायतीचे अधिकार न्यायालयानेच रदबातल केल्यामुळे स्त्रियांवर घातली जाणारी बंधने दूर होऊन त्यांना न्याय मिळाला.

न्यायालयाने दिलेल्या निर्णयांतून स्त्रियांना प्रतिष्ठा आणि सन्मान देणारे अनेक कायदे संसदेला करावे लागले.

**(2)** राजकीय प्रक्रिया पारदर्शक होण्यासाठी पुढील प्रयत्न केले जातात –

(१) निवडणुका खुल्या आणि न्याय्य वातावरणात घेण्यासाठी स्वतंत्र निवडणूक यंत्रणा निर्माण केली जाते.

(२) राजकारणाचे गुन्हेगारीकरण रोखण्यासाठी कडक शिक्षा देणारे कायदे निर्माण केले जातात.

(३) राजकारणात आणि निवडणुकीत भ्रष्टाचार होऊ नये; म्हणून कायदेनिर्मिती केली जाते.

(४) भ्रष्टाचारी, गुन्हेगार अशांना दोन वर्षांपेक्षा जास्त कालावधीची शिक्षा झाली असल्यास राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्यास न्यायालयांनी बंदी घातली आहे.